# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## एम. ए. भाग १ व २ सत्र १ ते ४ मराठी (जुना अभ्यासक्रम)
## ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ परीक्षा

आपण दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये प्रवेश घेतल्याबद्दल आपले स्वागत. एम. ए. भाग १ व २ या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक विषयासाठी ८० गुणाची लेखी परीक्षा + २० गुणांचे स्वाध्याय अशी सत्र परीक्षापध्दती लागू आहे. **एम. ए. भाग १ व २ सत्र १ ते ४ साठी जुन्या अभ्यासक्रमानुसार प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांकरिता स्वाध्याय प्रश्न सोबत देत आहोत.** सदरचे स्वाध्याय खाली दिलेल्या नियमावलीप्रमाणे पूर्ण करून आपल्या **अभ्यास केंद्राकडे** जमा करणे आवश्यक आहे. **दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये स्वाध्याय स्वीकारले जाणार नाहीत.**

**नियम :**

1. सत्र परीक्षामध्ये प्रत्येक पेपरसाठी लेखी परीक्षा ८० गुण व स्वाध्याय २० गुण अशी एकूण १०० गुणांची आहे. फक्त सत्र २ मधील अभ्यासपत्रिका ८.४ सर्जनशील लेखनाचे स्वरुप या पेपरच्या लेखी परीक्षेकरिता ५० गुण व स्वाध्यायाकरिता ५० गुण राहतील.
2. सत्र १ ते ४ करिता प्रथम पुनर्प्रवेशित विद्यार्थ्यांनी (Repeater) तुम्ही निवडलेल्या प्रत्येक पेपरसाठी एक असे स्वाध्याय पूर्ण करावयाचे आहेत. स्वाध्याय लिहिण्याकरिता आखीव कागद/ A4 size paper वापरावा.
3. स्वाध्याय उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर आपण प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नाव, वर्ष, तुमचा परीक्षेचा बैठक क्रमांक, नोंदणीप्रमाणे नाव, पत्ता (कायमस्वरुपी), विषय, PRN व मोबाईल नंबर (कायमस्वरुपी) लिहिणे आवश्यक आहे. (मुख्यपृष्ठ / Cover Page यासोबत दिलेले आहे ते Download करुन वापरावे)
4. लिहून पूर्ण केलेले सर्व पेपर्सच्या स्वाध्यायावर आपला परीक्षा बैठक क्रमांक (Exam seat No.) लिहूनच प्रवेशासाठी निवडलेल्या अभ्यास केंद्रावर विहीत वेळेत पोहोच करावेत (बैठक क्रमांक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.inया संकेतस्थळावर उपलब्ध होतील.) **स्वाध्याय जमा करताना स्वाध्यायासोबत हॉलतिकीटची झेरॉक्स प्रत जोडावी.**
5. विद्यार्थ्यांनी स्वाध्याय अभ्यास केंद्रामध्ये जमा करणेच्या अंतिम तारखा स्वतंत्र परिपत्रकाद्वारे www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Distance Education → Online Notice Board (http://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx) या लिंकवरती नंतर प्रसिध्द करण्यात येतील यांची संबधितांनी नोंद घ्यावी.
6. एकदा स्वाध्यायांचे मूल्यांकन झाल्यानंतर त्यांचे पूर्नमुल्यांकन व श्रेणीसुधार केले जाणार नाही. त्याची फोटोकॉपी मिळणार नाही.

7. जे विद्यार्थी दिलेल्या वेळेत स्वाध्याय जमा करतील त्याच विद्यार्थ्यांना स्वाध्यायाचे गुण दिले जातील. जे विद्यार्थी स्वाध्याय जमा करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना स्वाध्यायाचे गुण दिले जाणार नाहीत. त्यास दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र जबाबदार राहणार नाही.

## विशेष सूचना

- दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या सर्व मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रावर संपर्क सत्राचे आयोजन केले जाते. तरी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी अभ्यास केंद्र समन्वयक यांच्याशी संपर्क साधून संपर्क सत्र, परीक्षा वेळापत्रक, हॉलतिकीट, निकाल इत्यादी बाबत माहिती घ्यावी. तसेच वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळाला भेट देवून अद्ययावत माहिती जाणून घ्यावी.

- आपण निवडलेल्या विषयाप्रमाणे स्वयंअध्ययन साहित्य घेणे, आपल्या पाठयक्रमाचा अभ्यासक्रम (Syllabus) प्राप्त करुन घेणे व त्याप्रमाणे अध्ययन करणेची जबाबदारी विद्यार्थ्याची आहे.

- **आपल्या रजिस्ट्रेशन फॉर्मवर असलेल्या अभ्यासकेंद्रामध्येच स्वाध्याय जमा करावयाचे आहेत जर दुसऱ्या अभ्यासकेंद्रावर स्वाध्याय जमा केले तर स्वाध्यायाचे गुण आपल्या गुणपत्रिकेवर येणार नाहीत व त्यासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र जबाबदार असणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

स्वाध्याय उत्तर पत्रिकेचे मुखपृष्ठ (Cover Page)

| परीक्षा बैठक क्रमांक |
|---|
| |

अभ्यासक्रमाचे नांव : ............................................................................

(बी.ए./बी.कॉम. भाग 1 एम.ए./एम कॉम भाग 1 व 2)

सत्र : ....................................................................................................

(पहिले/दूसरे/तिसरे/चौथे/पाचवे/सहावे)

विषय :....................................................................................

1. अभ्यास केंद्राचे नाव ——————————————————————
2. विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव ——————————————————————
3. पूर्ण पत्ता : ——————————————————————————

——————————————————————————————

—————————————————————— पिन कोड नं.——————

4. मोबाईल क्रमांक : लॅण्डलाईन क्रमांक :
5. अभ्यासक्रमाचे नाव : —————————— सत्र ——————————
6. पेपरचे नाव : ————————————————————————
7. पेपर क्रमांक : ————————————————————————
8. सबजेक्ट कोड : ————————————————————————
9. परीक्षा बैठक क्रमांक ——————————————————————
   (ज्या परीक्षेसाठी स्वाध्याय जमा करत आहे)
10. पी.आर.एन. : ————————————————————————
11. स्वाध्याय जमा करण्याचा दिनांक : ————————————————
12. विद्यार्थ्यांची स्वाक्षरी : ——————————————————————

---

(फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता)

मिळालेले गुण : ————————————————————————

परीक्षकांची स्वाक्षरी : ——————————————————————

M.A. Part I and II Sem. I to IV Marathi (Old Syllabus)

Assignment Question October/November 2024 Exam

एम. ए. भाग १ व २ सत्र १ ते ४ मराठी (जुना अभ्यासक्रम)

स्वाध्याय प्रश्न ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ परीक्षा

(प्रत्येक प्रश्नास २० गुण)

## एम.ए.मराठी सत्र १

**अभ्यासपत्रिका क्रमांक १ : भाषिक आविष्काराची रूपे**

१. भाषिक आविष्काराचे स्वरूप सांगून भाषेची सर्जशीलप्रक्रिया कशी चालते ते स्पष्ट करा.

किंवा

२. 'भाषा' आणि 'साहित्य' यांच्यातील सहसबंध स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक २. १ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास**

१. 'आज्ञापत्र' चे वाङ्.मयीन मूल्यमापन करा.

किंवा

२. 'हिंदू—जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीतील सामाजिक — सांस्कृतिक संदर्भाचा आढावा घ्या.

**अभ्यासपत्रिका क्रमांक २.२ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास**

१. संत एकनाथांच्या भारूडांमधील भाषाविशेष सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

२. म.फुले यांच्या पोवाडा या लेखनशैलीची वैशिष्टये सांगा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ३ : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (स्वातंत्र्यपूर्वकाळ)**

१. भाषांतर म्हणजे काय ते सांगून भाषांतराचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करा.

किंवा

२. कथात्म साहित्याची संकल्पना स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ४. २ : लोकसाहित्य व लोककला**

१. लोकसाहित्य म्हणजे काय ते सांगून लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

२. लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धतींचा परिचय करून द्या.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ४. ३ : आधुनिक भाषाविज्ञान**

१. संप्रेषण म्हणजे काय ते सांगून भाषिक व भाषेत्तर संप्रेषण सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

२. ध्वनीपरिवर्तन म्हणजे काय ते सांगून ध्वनीपरिवर्तनाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ४. ४ : सर्जनशील लेखनाचे स्वरूप**

१. सर्जनशील लेखनातून व्यक्त होणारे व्यक्ती आणि समाज यांच्यातील नातेसंबधं स्पष्ट करा.

किंवा

२. सर्जनशील लेखनाचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

## एम.ए.मराठी सत्र २

**अभ्यासपत्रिका क्रमांक ६ : साहित्यप्रकारांचा सूक्ष्म विचार**

१. ‘ कविता’ व ‘दीर्घकविता’ या साहित्यप्रकारांची ओळख करून द्या.

किंवा

२.‘आत्मचरित्र’ व ‘प्रवासवर्णन’ या साहित्यप्रकारांची ओळख करून द्या.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ६. १ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास**

१. संत जनाबाईच्या अभंगाचा थोडक्यात परिचय करून द्या.

किंवा

२.‘आठवणींचे पक्षी’ या कांदबरीतील दलित जीवनचे चित्रण सोदाहरण स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ६.२ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास**

१. सभासदांच्या बखरीचे वाङ्.मयीन दृष्टीकोणातून मूल्यमापन करा.

किंवा

२. ‘जीणं आमचं’ या आत्मकथनाचा थोडक्यात परिचय करून द्या.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ७ : आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास (स्वातंञ्यत्तोरकाळ)**

१. महानगरीय साहित्याचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

किंवा

२.स्वातंञ्यत्तोर कालखंडातील दलित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ८. २ : लोकसाहित्य व लोककला**

१. ‘गोंधळ ’ व ‘दशावतार’ यांचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

२.लोककथांची भारतीय परंपरा थोडक्यात विशद करा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ८.३ : आधुनिक भाषाविज्ञान**

१. भाषाकुल म्हणजे काय? ते सांगून जगातील प्रमुख भाषाकुलाची ओळख करून द्या.

किंवा

२. प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्यातील साम्य–भेद स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ८. ४ : सर्जनशील लेखनाचे स्वरूप**

खालील कोणत्याही साहित्यप्रकारावर स्वत:चे लेखनप्रकल्प सादर करण्यात यावे. सदर लेखनप्रकल्पास ५० गुण आहेत.

१. कथा (किमान ४)
२. कविता (किमान २०)
३. एकांकिका किंवा दीर्घांक (किमान १)
४. कादंबरी (किमान १ साधारणपणे १०० पृष्ठे)

## एम.ए.मराठी सत्र ३

### अभ्यासपत्रिका क्रमांक ९ : समाजभाषाविज्ञान

१. 'भाषा, समाज आणि संस्कृती' यांचा संहसंबध स्पष्ट करा.

किंवा

२. 'भाषिक भांडार' व 'द्वैभाषिकता' या संकल्पना स्पष्ट करा.

### अभ्यासपत्रिका क्रमांक १०. १ : वाङ्मयीन संस्कृती

१. 'समाज, संस्कृती आणि वाङ्मय' यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

२. वाङ्मयीन संस्कृतीच्या आधुनिक घटकांचा परियच करून द्या.

### अभ्यासपत्रिका क्रमांक १०.२ : प्रभाव अभ्यास

१. प्रभाव अभ्यास म्हणजे काय ते सांगून प्रभाव अभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

२. प्रभावाची कारणे सोदाहरण स्पष्ट करा.

### अभ्यासपत्रिका क्रमांक ११ : समीक्षा सिद्धांत आणि उपयोजन

१. समीक्षा म्हणजे काय ते सांगून मानसशास्त्रीय समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

२. मराठीतील आदिबंधात्मक समीक्षेचा परिचय करून द्या.

**अभ्यासपत्रिका क्रमांक १२. २ : तौलनिक साहित्याभ्यास**

१. तौलनिक साहित्याभ्यासाच्या उदयाची पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करा.

किंवा

२. तौलनिक साहित्याभ्यासाची वैशिष्टये सोदाहरण विशद करा. .

**अभ्यासपत्रिका क्रमांक १२. ३ : बोली अभ्यास**

१. भाषा, बोली आणि समाज यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

किंवा

२. बोलीभाषांची निर्मितीप्रक्रिया विशद करा.

## एम.ए.मराठी

## सत्र ४

### अभ्यासपत्रिका क्रमांक १३ : समाजभाषाविज्ञान

१. समाजात भाषाव्यवहार आणि भाषासंपर्क कसा होतो? ते लिहा.

किंवा

२. बोलींचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास कोण—कोणत्या प्रकारे करता येतो, ते लिहा.

### अभ्यासपत्रिका क्रमांक १४. १ : वाङ्मयीन संस्कृती

१. वाङ्मयीन अभिरूची म्हणजे काय ? ते सांगून ग्रामीण व नागर अभिरूचीचे स्वरूप विशद करा.

किंवा

२. मराठीतील 'सत्यशोधकीय साहित्याचा' थोडक्यात परिचय करून द्या.

### अभ्यासपत्रिका क्रमांक १४.२ : प्रभाव अभ्यास

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याचा आढावा घेवून त्याचा मराठी साहित्यावर पडलेल्या प्रभावाची थोडक्यात चर्चा करा.

किंवा

२. 'सुनीत' व 'गझल' या रचनाप्रकराचा आधुनिक मराठी कवितेवर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

### अभ्यासपत्रिका क्रमांक १५ : मराठी समीक्षेची वाटचाल

१. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील श्री. कृ. कोल्टकर व श्री. व्यं. केतकर यांचा समीक्षाविचार स्पष्ट करा.

किंवा

२. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कुसुमावती देशपांडे व शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा समीक्षाविचार स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमाक १६. २ : तौलनिक साहित्याभ्यास**

१. तौलनिक साहित्यातील वास्तववाद व आधुनिकतावाद या सांप्रदायांची थोडक्यात ओळख करून द्या.

किंवा

२. जागतिकीकरण आणि देशीवाद यांचे स्वरूप स्पष्ट करा.

**अभ्यासपत्रिका क्रमाक १६. ३ : बोली अभ्यास**

१. बोलीच्या संरचनेतील रूपिम विचार सविस्तर स्पष्ट करा.

किंवा

२. बोलींची क्षेत्रिय पाहणी कशी केली जाते? ते कोल्हापूरी बोलीच्या संदर्भाने लिहा.